ऊस पिकाखालील क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठीच्या योजनेच्या प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयातील अट क्रमांक-९ सन २०१८-१९ या वर्षासाठी शिथिल करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक: सुसिंयो-२०१७/प्र.क्र.५८/१४अे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक: ३० नोव्हेंबर, २०१८.

<u>संदर्भ:</u>

१. शासन निर्णय क्रमांक: सुसिंयो-२०१७/प्र.क्र.५८/४अे, दि. २४ जुलै, २०१७.
२. आयुक्त कृषी यांचे पत्र क्र.कृआआ-२०१८/ सुसिंयो/ प्र.मं.कृ.सिं.यो/प्र.मा/प्र.क्र.०५/१०८६/ फलो-४, दि.३१ ऑक्टोबर, २०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

दि, २४ जुलै, २०१८ च्या शासन निर्णयान्वये, "ऊस पिकाखालील क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्याची योजना" राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद.क्र.९ नुसार, "ऊस पिकाखालील क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी राबविण्यात येणारी योजना ज्या भागामध्ये राबविली जाईल, त्या भागामध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत- प्रति थेंब अधिक पीक घटकाखाली राबविण्यात येणारी केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना "ऊस" पिकासाठी बंद करावयाची आहे". तथापि, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी अवलंबावयाची प्रत्यक्ष कार्यपद्धती विचारात घेता, सदर योजनेची अंमलबजावणी सन २०१८-१९ या वर्षात करणे शक्य होणार नाही. राज्यातील दुष्काळी परिस्थिती विचारा घेता सदर योजनेची अंमलबजावणी ज्या भागात करण्याचे नियोजित आहे त्या भागातील शेतकरी सुक्ष्म सिंचनाच्या लाभापासून वंचित राहू नयेत यासाठी सन २०१८-१९ या वर्षासाठी सदर तरतूदीमधून सुट देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय:-</u>

१. संदर्भाधीन दि. २४ जुलै, २०१७ च्या शासन निणर्यातील परिच्छेद क्र.९ मधील, "ऊस पिकाखालील क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी राबविण्यात येणारी योजना ज्या भागामध्ये राबविली जाईल, त्या भागामध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत- प्रति थेंब अधिक पीक घटकाखाली राबविण्यात येणारी केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना "ऊस" पिकासाठी बंद करावयाच्या" तरतूदीमधून सन २०१८-१९ या वर्षासाठी सुट देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८११३०१६२५३८८७०१असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c,
serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.11.30 16:37:11 +05'30'

(श्रीकांत आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. मंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. मंत्री (सहकार), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा. मंत्री (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा. राज्यमंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. राज्यमंत्री (सहकार), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
७. मा. राज्यमंत्री (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
९. अ. मु. स. (वित्त), वित्त विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
१०. अ. मु. स. (नियोजन), नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
११. प्र.स. (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
१२. आयुक्त कृषि , कृषि आयुक्तालय, महाराष्ट राज्य पुणे.
१३. साखर आयुक्त, साखर संकुल, शिवाजी नगर, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. मुख्य महाव्यवस्थापक,नाबार्ड, ५४, वेलस्ली रोड,शिवाजी नगर, पुणे.
१५. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे (१० प्रतीसह)
१६. सर्व संचालक/सह संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट राज्य पुणे.
१७. सर्व विभागीय कृषी सह संचालक,
१८. सर्व विभागीय आयुक्त,
१९. सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन विकास मंडळ,
२०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
२२. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२४. सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
२५. महासंचालक माहिती व जनसंपर्क सचालनालय,मुंबई.
२६. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
२७. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा परिक्षा) मुंबई /नागपूर

२८. सर्व सहसचिव/उपसचिव/अवरसचिव/कार्यासन अधिकारी, (कृषि) कृषि व पदुम विभाग
२९. वित्त विभाग व्यय १/अर्थसंकल्प १३, मंत्रालय, मुंबई -३२
३०. नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई - ३२,
३१. निवड नस्ती.